# कोल्हापूर जिल्हा परिषद
## अर्थ समिती सभा क्रमांक - ११/२०१७-१८

वार - बुधवार
दिनांक -२५/०१/२०१८

वेळ - दु. १.०० वा.
स्थळ - समिती सभागृह

### -: कार्यवृत्तांत :-

अर्थ समिती जिल्हा परिषद कोल्हापूरची मासिक सभा गुरुवार दि. २५/१/२०१८ रोजी दु. १.०० वाजता श्री.वसंतराव नाईक सभागृह जि.प.कोल्हापूर येथे आयोजित करणेत आलेली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री.अंबरिषसिंह संजय घाटगे | सभापती |
| २. | मा. श्री.विजय गंगाधर बोरग | सदस्य |
| ३. | मा. श्री.पांडुरंग हिंदुराव भांदिगरे | सदस्य |
| ४. | मा. श्री.दिलिप हरी कांबळे | सदस्य |
| ५. | मा. श्री.पृथ्वीराज भगवानराव सरनोबत | सदस्य |
| ६. | मा. सौ.जयश्री संतोष तेली | सदस्य |

येणेप्रमाणे मा.सदस्य उपस्थित झालेनंतर मा.सभापती सभा कामकाज सुरु करणेबाबत सुचित केले.

**श्री. संजय राजमाने, मुख्य लेखा व वित्त अधिकारी -**

आजच्या वित्त समितीच्या बैठकीस उपस्थित असेलेले मा.समिती सभापती व सदस्य महोदय तसेच वित्त विभाग व इतर विभागाकडील माझे सहकारी अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरवात करत आहे.

**श्री. राहुल के.कदम, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी -**

आदरणीय सभापती महोदय यांचे परवानगीने मी विषय पत्रिकेवरील विषयावरील कामकाजास सुरुवात करतो.

**विषय क्रमांक - १**

**मागील सभा दि.०३/०१/२०१८ चा कार्यवृत्तांत वाचुन कायम करणे.**

**ठराव क्रमांक - २४**

**मागील सभा दि.०३/०१/२०१८ चा कार्यवृत्तांत वाचुन कायम करणेत यावा.**

सुचक - मा.सौ.जयश्री संतोष तेली
अनुमोदक-मा.श्री.दिलिप हरी कांबळे
ठराव सर्वानुमते मंजुर.

**विषय क्रमांक -२**

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील माहे **डिसेंबर २०१७** ची जमा व खर्चाची पत्रके अवलोकन करणे व अंतिम मंजुरीसाठी स्थायी समितीकडे शिफारस करणे.

**ठराव क्रमांक - २५**

वित्त विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर कडील माहे **डिसेंबर २०१७** ची जमा व खर्च पत्रकांना मान्यता देऊन अंतिम मंजुरीसाठी स्थायी समितीकडे शिफारस करणेत यावी.

सुचक - मा.पृथ्वीराज भ.सरनोबत
अनुमोदक-मा.पृथ्वीराज भ.सरनोबत
ठराव सर्वानुमते मंजुर.

**मा.सभापती -** कॅफो साहेब, येणा-या समिती बैठकीमध्ये बहुधा सन २०१७-१८ चे सुधारित व २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रक सादर केले जाईल. यासाठी सदर बैठकीपुर्वी सर्व खातेप्रमुखांचे बरोबर कॅफो साहेब बैठक आयोजित करणेत यावी व सर्व विभागांचे योजनांचा आढावा घेणेत येईल.

**श्री. राजमाने, मुलेविअ -** आदरणीय सभापती महोदय, याबाबत कार्यवाही करणेत येईल. व सर्व खातेप्रमुख यांना अवगत करुन बजेटबाबत अद्यावत माहितीसह बैठकीसाठी नियोजन करणेत येईल.

**मा.श्री.बोरगे -** सभापती महोदय, जिल्हा परिषदेकडील अर्थ समितीकडुन वित्तिय धोरणे ठरविणेबाबत कामकाज पाहिले जाते तथापि, अन्य समितींना निधी मिळतो मात्र अर्थ समिती सदस्यांना काहीही योजना नाही. याबाबत किमान अन्य समितींकडील योजनांचा लाभ अर्थ समिती सदस्यांना थोडयाफार प्रमाणात मिळावी ही अपेक्षा आहे. कारण योजना नसलेने आमच्या मतदारसंघातील लाभार्थ्यांना आम्ही न्याय देऊ शकत नाही.

**मा.सभापती -** बोरगे साहेब, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन पाठपुरावा करु. तसेच, डिसेंबर महिन्याचा खर्च पाहता बांधकाम व ग्रामिण पाणी पुरवठा विभागाकडील खर्च झालेला आहे. अन्य विभागांचे योजनांचे खर्चाचे प्रमाण अत्यल्प आहे.याबाबत विभाग प्रतिनिधी यांनी खातेप्रमुख बैठकीमध्ये योग्य तो खुलासा सादर करावा.

**मा.श्री.सरनोबत -** मा.सभापती महोदय, आम्हा पंचायत समिती सभापती यांना आपल्याप्रमाणे जि.प.स्वनिधी अंतर्गत निधी उपलब्ध होऊन मिळावा ही विनंती आहे.

**मा.सभापती -** सरनोबत साहेब, यासाठी येत्या अंदाजपत्रकामध्ये पंचायत समिती सभापती यांना निधी मिळणेबाबत मा.अध्यक्ष यांचेकरवी कार्यवाही करणेत येईल.

तसेच, सर्व विभागांना कळविणेत येते की, चालु वर्षातील खर्चाची टक्केवारी कमी दिसुन येते तरी आपल्या विभागांकडील योजनांबाबत देयके अर्थ विभागाकडे सादर करुन रक्कम अखर्चित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी -** विभागाकडील सर्व प्रतिनिधी यांना सुचित करणेत येते की, मा.सभापती यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करुन आपल्या विभागाकडील योजनांच्या सर्व नस्ती बिनचुक अर्थ विभागाकडे मंजुरीस्तव सादर कराव्यात, जेणेकरुन निधी विहित मुदतीत खर्च होईल.

अन्य विषय व चर्चा नसलेने मा.सभापती यांनी पुढीलप्रमाणे आभार मानले.

**मा.सभापती -** आजच्या वित्त समितीला उपस्थित असणारे सन्माननीय सर्व सदस्य / सदस्या त्याचप्रमाणे सचिव श्री.राजमाने साहेब व त्यांचा सहकारी अधिकारी व कर्मचारी वर्ग त्याचप्रमाणे उपस्थित इतर खात्याकडील अधिकारी व कर्मचारी यांनी आजच्या वित्त समितीचे सभा कामकाज चालविणेसाठी दिलेल्या सहकार्याबददल अर्थ समितीच्या वतीने मी सर्वांचे मन:पुर्वक आभार मानतो. तसेच, उपस्थित सर्व सन्माननीय सदस्य व सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी नवीन वर्षाच्या शुभेच्छा देतो व पुढील सभेस सर्व खात्याकडील खर्चाची माहिती घेणेकामी सर्व सबंधीत अधिकारी वर्गास उपस्थित राहणेची सुचना करुन आजची सभा संपल्याचे जाहिर करतो.

दि. २५/०१/२०१८.

(संजय ध.राजमाने)
सचिव
अर्थ समिती,
जिल्हा परिषद कोल्हापूर

(श्री.अंबरिषसिंह संजय घाटगे)
सभापती
अर्थ समिती,
जिल्हा परिषद कोल्हापूर